**महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ च्या नियम २५(१) मधील तरतुदीनुसार भ.नि.नि. खाती नियमित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- भनिनि-२००६-२३६/प्र.क्र.३५/०६/१३अ,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- २६ जुलै, २००६.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ मधील नियम २५(१) मध्ये "सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या वर्गणीदाराला पुन्हा सेवेत घेण्यात आले तर, शासनाने तसे करायला फर्मावल्यास वर्गणीदाराला या नियमाच्या तरतूदीनुसार निधीमधून देण्यात आलेली रक्कम तो नियम १२ मध्ये नमूद केलेल्या दराने त्यावरील व्याजासहीत परत करील, व अशी परत करण्यात आलेली रक्कम निधीमध्ये त्याच्या खात्यात जमा करण्यात येईल", अशी स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. सदरहू तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फ/काढून टाकलेल्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीदाराला सेवेत पुन:स्थापित केल्यानंतर त्यांना प्रदान करण्यात आलेली भविष्य निर्वाह निधी ची रक्कम व्याजासहीत त्यांचेकडून वसूल करुन घेऊन त्यांच्या जुन्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे आवश्यक असते. तथापि या प्रकरणी महालेखापाल कार्यालयास आढळून आले आहे की, काही आहरण व संवितरण अधिकारी भविष्य निर्वाह निधी नियम क्र.२५(१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही पूर्ण न करता अशा वर्गणीदारांकडून मासिक भविष्य निर्वाह निधी वर्गणी वसुल करुन त्यांच्या जुन्या भविष्य निर्वाह निधी खात्यात ती जमा करण्याची अथवा नवीन भ.नि.नि.खाते क्रमांक प्रदान करण्याची मागणी करतात. तथापि, उक्त भविष्य निर्वाह निधी नियम क्र.२५(१) च्या पूर्ततेशिवाय संबंधित वर्गणीदारांचे जुने भविष्य निर्वाह निधी खाते पुढे चालू ठेवता येत नाही व याच्या परिणामी विभागाने संबंधित कर्मचा-यांच्या पुन:स्थापनेनंतर त्यांचेकडून वसुल केलेली भविष्य निर्वाह निधीच्या मासिक वर्गणीची रक्कम निलंबित खात्यात (Suspense Account) ठेवावी लागते.

२. वरीलप्रमाणे अनियमितता टाळण्याकरीता असे आदेश देण्यात येत आहेत की, सेवेतून काढून टाकलेल्या/बडतर्फ केलेल्या भनिनि वर्गणीदारांना सेवेत पुन:स्थापित केल्यानंतर त्यांचा जुना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम क्र.२५(१) मधील तरतुदीचे सर्वप्रथम काटेकोरपणे पालन करावे. सदर तरतुदीची पूर्तता केल्यानंतरच संबंधित वर्गणीदाराचा जुना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक पुढे चालू ठेवण्यात येऊन सदरहू भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये त्याची सेवेत पुन:स्थापित केल्यानंतरची दरमहा मासिक वर्गणी महालेखापाल कार्यालयाव्दारे दर्शविण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २००६०७२६१७०७२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि.बा.दळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई,

(कृ.मा.प.)

ए-५-२२६०(३०००-१०-०६)

मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मंबई,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल(लेखा परीक्षा)-१,महाराष्ट्र,नागपूर,
महालेखापाल(लेखा परीक्षा)-२,महाराष्ट्र,नागपूर,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई,
* प्रबंधक,उच्च न्यायालय,मुळ न्यायशाखा,मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा विभाग, महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-१
महाराष्ट्र यांचे कार्यालय, भविष्य निर्वाह निधी शाखा, जुनी सी.जी.ओ. बिल्डींग,
न्यू मरीन लाईन्स,१०१ महर्षि कर्वे रोड,मुंबई-४०० ०२०(५० जादा प्रतीसह),
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
संचालक,माहिती तंत्रज्ञान संचालनालय,मुंबई,(५ प्रती)
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख,
प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई,मंत्रालय,मुंबई(५प्रती)
मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय,मंत्रालय,मुंबई(२प्रती)
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
• पत्राने

---

ए-५-१२६०(३०००-८-०६)